महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा
महाराष्ट्र

स्वच्छ भारत

केवळ शासकीय कामाबाबत

**योगेश सागर**
आमदार

जा.क्र./चा.वि.स./०५३/२०२३
दि.:०१/०१/२०२३

प्रति,
श्री.इक्बालसिंह चहल (भा.प्र.से.)
मा.आयुक्त-बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय : अर्थसंकल्प २०२३-२४ व सुधारीत अर्थसंकल्पीय २०२२-२३ तयार करण्याची कार्यवाही.**

महोदय,

दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यांपासून अर्थसंकल्प बनवण्याची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त सुरू करतात. त्याप्रमाणे चालू अर्थसंकल्पीयचा सुधारीत अंदाज सन २०२२-२३ आणि येणाऱ्या सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प तयार करण्याची कार्यवाही सुरू झाली असेल.

सद्या बृहन्मुंबई महानगरपालिकेचा ५ वर्षाचा कालावधी संपला आहे व पुढील निवडणूका न झाल्यामुळे महानगरपालिका, स्थायी समिती, शिक्षण समिती, बेस्ट समिती, इ.समित्या बरखास्त झाल्यामुळे सद्या अस्तित्वात नाहीत. त्याचे सर्व प्रशासकीय अधिकार महानगरपालिका आयुक्ताकडे एकत्रित झाले आहेत.

बृहन्मुंबई विभागातील विविध प्रकल्प जसे रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण, दुरूस्ती, पदपथ सुधारणा व सुशोभिकरण, पूल व उड्डाणपूलांची कामे, वाहतूक बेटे, उद्याने, खेळाच्या मैदानांची कामे इ.कामे लोकप्रतिनिधी विविध समित्यांमार्फत अर्थसंकल्पात समाविष्ट करतात. त्यावर विविध खाते प्रमुख हे अतिरिक्त आयुक्त व मनपा आयुक्तांबरोबर विचार परामर्श करून अर्थसंकल्पात कामे अंतर्भूत करून मंजूरी घेतात परंतू या समिती अस्तित्वात नसल्यामुळे सविस्तर चर्चा होणार नाही.

महानगरपालिका आयुक्तांनी या विविध समितीप्रमाणे विविध खाते प्रमुख, अतिरिक्त आयुक्त आणि प्रमुख लेखपाल यांच्यासहित सर्वांना एकत्रित अंतर्भूत करून लोक प्रतिनिधी, आमदार, खासदार यांना बोलावून बैठका घ्याव्यात म्हणजे प्रकल्पाचा आढावा, पुनर्विलोकन आणि सविस्तर चर्चा आयोजित करावी त्यामुळे आमच्या सारख्यांना अर्थसंकल्पीय कार्यवाहीत भाग घेऊन विभागातील कामाच्या सुचना देता येतील व सविस्तर चर्चा होईल तसेच अर्थसंकल्प बनवताना स्पष्टता व पारदर्शकता येण्यासाठी या सर्व कार्यवाहीमधील अर्थसंकल्प नेहमीप्रमाणे प्रसिध्द करावे व वेबसाईटवर उपलब्ध करावे.

महानगरपालिका आयुक्तांनी वर सुचविल्याप्रमाणे १५ ते २० दिवसात बैठकांचे आयोजन करावे ही विनंती.

धन्यवाद.

आपला स्नेहांकित

योगेश सागर

जनसंपर्क कार्यालय : अमरकांत झा स्मृति, (कांति टेरेस), दुसरा माला, स्वामी विवेकानंद रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७. दुरध्वनी : फॅक्स : २८०१ ३२०१
भेटण्याची वेळ : सोमवार- बुधवार-शुक्रवार : सकाळी ८.३०ते १०.३० पर्यंत
E.mail : yogesh_sagar09@yahoo. co.in

Scanned with CamScanner